**पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टंचाई निवारक उपाययोजना घेण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- टंचाई-१००१/प्र.क्र.१६५/पापु-१४**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- १० डिसेंबर, २००१.**

**संदर्भ :-**

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक टंचाई-१०९९/प्र.क्र.१२/पापु-१४, दिनांक ३.२.१९९९.

२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००१/प्र.क्र.२५०/पापु-०७ दिनांक ३१.३.२००१.

**प्रस्तावना :-**

राज्यातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई सदृश परिस्थिती निर्माण झाल्यास तेथे टंचाई निवारक उपाययोजना घेण्यासंबंधी शासनाने संदर्भाधीन दि. ३.२.१९९९ च्या शासन निर्णयान्वये स्थायी आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार टंचाई निवारक कार्यक्रमांतर्गत १) नळ योजनांची विशेष दुरुस्ती, २) तात्पुरत्या पुरक नळ योजना, ३) विंधण विहिरी घेणे, ४) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती इत्यादी उपाययोजना, टंचाईग्रस्त भागात राबविण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना प्रदान करण्यात आले आहेत व सदर कार्यक्रमावर विभागीय आयुक्तांनी संनियंत्रण ठेवावयाचे आहे. तसेच टंचाई निवारक उपाययोजनांवरील खर्च भागविण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त आणि संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना **" लेखाशीर्ष २२१५ "** (योजनेतर) अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत होता. यापुढे पाणी टंचाई निवारण कार्यक्रमाकरिता आवश्यक सर्व निधी नैसर्गिक आपत्ती अंतर्गत **" लेखाशीर्ष २२४५ "** खाली उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ ऑक्टोबर २००१ पासून घेण्यात येणा-या १) नळ योजनांची विशेष दुरुस्ती, २) तात्पुरत्या पुरक नळ योजना, ३) विंधण विहिरी घेणे, ४) विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती या कामांना यापुढे महसूल व वन विभागाकडून उपलब्ध होणा-या " लेखाशीर्ष २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०१, अवर्षण १०२, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (एक), निकडीच्या पाणी पुरवठा योजना (२२४५००९३) " अंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

२. संदर्भाधिन दि. ३१ मार्च, २००१ च्या शासन निर्णयान्वये या वर्षीपासून ग्रामीण भागातील पाणी टंचाई अंतर्गत विंधण विहिरी भूजल सर्वेक्षण व विकास यत्रणेऐवजी जिल्हा परिषदांमार्फत घेण्यात येणार असल्यामुळे यानंतर विंधण विहिरींसाठी अनुदान संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचेऐवजी संबंधित विभागीय आयुक्त यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तरी त्यानुसार विभागीय आयुक्त यांनी पाणी



४४५

टंचाई अंतर्गत निधीची मागणी करतांना इतर उपाययोजनांसोबतच विंधण विहिरी घेण्यासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करावी.

३. हा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक प्र.क्र.१०५७/व्यय-३, प्र.क्र.१३०७/२००१/व्यय-९ व प्र.क्र.४३३/अर्थ-१९ दि. १.१२.२००१ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(रु. न. देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. विभागीय आयुक्त, (सर्व)
२. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
३. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
४. जिल्हाधिकारी (सर्व)
५. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी (सर्व)
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
९. सह संचालक लेखा व कोषागरे संगणक कक्ष, नविन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मुंबई-३२ (०२ प्रतींसह)
१०. सदस्य सचिव (प्रशासन/तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
११. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१३. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१४. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोंकण भवन, नवी मुंबई
१५. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१६. महालेखापाल, महाराष्ट्र- १, मुंबई (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१७. महालेखापाल, महाराष्ट्र- २, नागपूर (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
१८. कक्ष अधिकारी, व्यय-३/व्यय-९/अर्थसंकल्प-३ व अर्थसंकल्प-१९, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. महसूल व वन विभाग, म-७, म-११ व म-३
२०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने
२१. निवड नस्ती, पापु-१४



४४६